इस पुस्तिका में **16** मुद्रित पृष्ठ हैं।
This Booklet contains **16** printed pages.

# DET–24–II

मुख्य परीक्षा पुस्तिका संख्या
Main Test Booklet No.

Language Code
**11**

## प्रश्न-पत्र—II / PAPER—II
## मराठी भाषा परिशिष्ट
## MARATHI LANGUAGE SUPPLEMENT
## भाग IV & V / PART IV & V

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**

**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ संख्या 16) पर दिए गए निर्देशों को ध्यान से पढ़ें।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page No. 16) of this Test Booklet.**

मुख्य परीक्षा पुस्तिका कोड/Main Test Booklet Code
**O**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका के पृष्ठ संख्या 2 व 15 देखें। / For Instructions in Marathi, see Page Nos. 2 and 15 of this Booklet.**

### परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग—IV (भाषा—I) **या** भाग—V (भाषा—II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं**।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेजी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग—IV व भाग—V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर-पत्र पर निशान लगाने के लिए **केवल नीले/काले बॉलपॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत O** है। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका का संकेत, उत्तर-पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं तथा प्रत्येक 1 अंक का है :

| | | |
|---|---|---|
| भाग—IV | : भाषा—I (मराठी) | (प्रश्न सं॰ 91–120) |
| भाग—V | : भाषा—II (मराठी) | (प्रश्न सं॰ 121–150) |

7. भाग—IV में भाषा—I के लिए 30 प्रश्न और भाग—V में भाषा—II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से सम्बन्धित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा—I और/या भाषा—II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है/हैं, तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लें। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन-पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग—V (भाषा—II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा—I (भाग—IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ़ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर-पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

### INSTRUCTIONS FOR CANDIDATES

1. This Booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part—IV (Language—I) **OR** Part—V (Language—II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part—IV and Part—V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Blue/Black Ballpoint Pen only** for writing particulars on this page/marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **O**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective-type Questions and each carrying 1 mark :

| | | |
|---|---|---|
| Part—IV: | Language—I (Marathi) | (Q. Nos. 91–120) |
| Part—V : | Language—II (Marathi) | (Q. Nos. 121–150) |

7. Part—IV contains 30 questions for Language—I and Part—V contains 30 questions for Language—II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi Language have been given. **In case, the language(s) you have opted for as Language—I and/or Language—II is/are language(s) other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The languages being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part—V (Language—II) in a language other than the one chosen as Language—I (Part—IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) :
Name of the Candidate (in Capitals) : ____________________

अनुक्रमांक (अंकों में)/Roll Number (in figures) : ____________________

: शब्दों में/in words : ____________________

परीक्षा-केन्द्र (बड़े अक्षरों में) :
Centre of Examination (in Capitals) : ____________________

परीक्षार्थी के हस्ताक्षर :
Candidate's Signature : ____________________

निरीक्षक के हस्ताक्षर :
Invigilator's Signature : ____________________

Facsimile Signature Stamp of Centre Superintendent ____________________

www.careerindia.com

CAREERINDIA

ही पुस्तिका 16 पानांची आहे.

| Language Code |
|---|
| 11 |

# DET–24–II

## प्रश्नपत्रिका––II

## मराठी भाषा पुरवणी

## भाग IV आणि V

चाचणी पुस्तिका कोड

| O |
|---|

ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.
या पुस्तिकेच्या मलपृष्ठ क्रमांक 15 आणि 16 वरील सूचना काळजीपूर्वक वाचा.

***परीक्षार्थींसाठी सूचना :***

**1.** ही पुस्तिका मुख्य चाचणी-पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग—IV (भाषा—I) **किंवा** भाग—V (भाषा—II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे**.

**2.** परीक्षार्थींनी मुख्य चाचणी-पुस्तिकेतील भाग—I, भाग—II आणि भाग—III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग—IV आणि V सोडवायचा आहे.

**3.** भाग—IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी-पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.

**4.** या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे किंवा निळे बॉलपॉइंट पेनच** वापरा.

**5.** या भाषा पुस्तिकेचे **कोड O** आहे. उत्तर-पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून घ्यावी.

**6.** या चाचणी-पुस्तिकेत—IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

| | | |
|---|---|---|
| भाग—IV | : भाषा—I (मराठी) | (प्र. सं. 91 ते 120) |
| भाग—V | : भाषा—II (मराठी) | (प्र. सं. 121 ते 150) |

**7.** भाग—IV मध्ये भाषा—I साठी **30** प्रश्न आहेत आणि भाग—V मध्ये भाषा—II साठी **30** प्रश्न आहेत. या चाचणी-पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा—I व/वा भाषा—II साठी निवडलेली भाषा मराठीपेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी-पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**

**8. भाग—V (भाषा—II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा—I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**

**9.** चाचणी-पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.

**10.** OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव (अंकांमध्ये) : ____________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ____________________

शब्दांमध्ये : ____________________

परीक्षाकेंद्र (अंकांमध्ये) : ____________________

परीक्षार्थीची सही : ____________________ पर्यवेक्षकाची सही : ____________________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

www.careerindia.com

परीक्षार्थींनी **भाषा–I** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील **(प्रश्न क्रमांक 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part–IV (Q. Nos. 91–120)**, if they have opted **MARATHI** as **Language–I** only.

www.careerindia.com

CAREERINDIA

# PART—IV / भाग—IV

## LANGUAGE—I / भाषा—I
## Marathi / मराठी

*महत्त्वपूर्ण* : परीक्षार्थींनी **भाषा–I** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील **(प्रश्न क्रमांक 91–120)** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना :** पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक **91** ते **96** यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.

हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणांच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरतीं
फुलराणी ही खेळत होती
गोड निळया वातावरणांत
अव्याज मनें होतीं डोलत
प्रणयचंचला त्या भ्रूलीला
अवगत नव्हत्या कुमारिकेला
आईच्या मांडीवर बसुनी
झोंके घ्यावे, गावीं गाणीं
याहुनि ठावें काय तियेला
साध्या भोळ्या फुलराणीला

पुरा विनोदी संध्यावात
डोलडोलवी हिरवें शेत
तोंच एकदां हांसत आला
चुंबून म्हणे फुलराणीला
"छान माझी सोनुकली ती
कुणाकडे ग पाहत होती?
कोण बरें त्या संध्येंतून
हळुच पाहते डोकावून?
तो रविकर का गोजिरवाणा
आवडला अमुच्या राणींना?"
लाजलाजली या वचनांनीं
साधी भोळी ती फुलराणी!

**91.** 'छान माझी सोनुकली' असे फुलराणीला कोण म्हणाले?

(1) वारा
(2) आई
(3) संध्या
(4) शेत

**92.** संध्याकाळी हळूच कोण डोकावून बघत आहे?

(1) फुलराणी
(2) कुमारिका
(3) सूर्य
(4) वारा

**93.** 'झोंके घ्यावे, गावीं गाणीं' या ओळीतील अधोरेखित शब्दांचे व्याकरण ओळखा

(1) कर्ता
(2) कर्म
(3) शब्दयोगी अव्यय
(4) क्रियापद

**94.** 'अव्याज' या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द कोणता?

(1) सरळ
(2) निष्कपट
(3) प्रेमळ
(4) साधा

**95.** फुलराणीच्या संदर्भात कवीने वापरलेला 'प्रणयचंचला' हा शब्द काय आहे?

(1) सर्वनाम
(2) शब्दयोगी अव्यय
(3) विशेषनाम
(4) विशेषण



www.careerindia.com

CAREERINDIA

**96.** 'आईच्या मांडीवर बसुनी' या ओळीतून कवी फुलराणीबद्दल काय सुचवत नाही?

(1) फुलराणीचे साधेपण
(2) फुलराणीचे निर्व्याजमन
(3) फुलराणीचा हट्टी स्वभाव
(4) फुलराणीचे लहानपण

**97.** भाषा शिक्षणाच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे?

(1) भाषा शिक्षणाला मुद्रितसंपन्न वातावरणात वेग मिळतो.
(2) विज्ञान आणि गणिताच्या शिक्षणासाठी भाषा शिक्षणाची गरज नसते.
(3) भाषा शिक्षण अनवधानाने होते
(4) भाषा शिक्षण हे फक्त भाषिक पाठ्यपुस्तके वाचून होते.

**98.** रडणे, हुंकारणे, बडबडणे ही सर्व कोणत्या स्तराच्या भाषिक विकासाची लक्षणे आहेत?

(1) पूर्व-भाषिक (Pre-linguistic)
(2) भावनिक (Expressive)
(3) ससंदर्भ (Referential)
(4) भाषिक (Linguistic)

**99.** गर्वित वर्गात आपल्या मित्रांसोबत हिंदीत गप्पा मारत होता. जेव्हां त्याच्या शिक्षकांनी हाक दिली तेव्हा त्याने इंग्रजीत उत्तर दिले. हे कशाचे उदाहरण आहे?

(1) बोली
(2) समाज भाषाविज्ञान
(3) भाषा-बदल
(4) भाषा-मिश्रण

**100.** प्रत्येक अभ्यासक्रमात शिक्षणाचे फलित (outcomes) यांचा उल्लेख असतो याचा अर्थ

(1) वर्गातील मुलांच्या वर्तनात होणारे बदल
(2) सर्वपाठ पूर्ण होणे
(3) शिक्षकाच्या शिक्षण पद्धतीत बदल
(4) पाठ्यपुस्तकातील सामग्रीचा विचार करणे

**101.** प्रत्येक अभ्यासक्रम शिक्षणाचे फलित यावर भाष्य करते. शिक्षणाचे फलित (learning outcomes) म्हणजे

(1) विद्यार्थांच्या वर्तन व्यवहारातील परिवर्तन
(2) सर्व पाठांचा अभ्यास पूर्ण करणे
(3) शिक्षकाच्या शिक्षण पद्धतीत बदल
(4) पाठ्यपुस्तकातील सामग्री विचारात घेणे

**102.** तुमच्या फोनमधील संपर्कसूचीतून एक नंबर शोधणे. हे कशाचे उदाहरण आहे?

(1) पाहणी (Survey)
(2) पुनर्पाहिणी (Review)
(3) चाळणे (Skimming)
(4) न्याहाळणे (Scanning)

**103.** विद्यार्थ्यांना नवीन शब्दाचा अर्थ पाठ करायला लावण्या ऐवजी त्यांना नवीन शब्द ससंदर्भ समजावून देणे

(1) शब्द नीट समजून घ्यायला मदत करते
(2) घोकंपट्टी करण्यास उत्तेजन देते
(3) वेळेचा अपव्यय आहे
(4) अनेकदा विद्यार्थ्यांना संभ्रमित करते

**104.** अशाप्रकारचे लेखन ज्यात लेखक स्वतः त्यातील पात्र बनतो (काहीवेळा नसतो ही) आणि निवेदन करतो. याला काय म्हणतात?

(1) लाघवी (Persuasive)
(2) वर्णनात्मक
(3) कथन
(4) निवेदनात्मक (Expository)

**105.** तुम्हाला तुमच्या वर्गातील जास्तीतजास्त मुलांना सहभागी करुन घ्यायचे आहे. यासाठी तुम्ही कोणत्या पद्धतीचा अवलंब कराल?

(1) सादरीकरण (Demonstration)
(2) आदर्शवाचन (Model reading)
(3) पाठांतर (Recitation)
(4) चर्चा (Discussion)

www.careerindia.com

CAREERINDIA

**106.** एक श्रोता ऐकताना विशिष्ट माहिती, संबंध आणि शब्दक्रमांची पद्धत ऐकतो. या प्रकारच्या ऐकण्याला काय म्हणता येईल?

(1) अधोगामी प्रक्रिया
(2) अनुमानित प्रक्रिया
(3) क्रमिक प्रक्रिया (Linear process)
(4) ऊर्ध्वगामी प्रक्रिया

**107.** कथेचा अभ्यास करताना पुढीलपैकी कोणती बाब 'वाचनादरम्यान उपक्रम' ठरु शकते?

(1) विद्यार्थी जोडीने परस्पर वाचतात.
(2) विद्यार्थी लेखकाच्या जीवनाविषयी चर्चा करतात.
(3) शिक्षक नवीन शब्दांचा अर्थ विचारुन त्यांना वाक्यात उपयोग करण्यास उत्तेजन देतात.
(4) विद्यार्थी कथेतील घटनांचा अनुमान लावण्यासाठी चर्चा करतात.

**108.** एका वर्गात तुम्ही प्रश्न न विचारता विद्यार्थ्यांना एक लहानसा मजकूर देऊन त्यांना प्रश्न तयार करण्यास सांगता. तुमच्या कृतीचे उद्दिष्ट कोणते?

(1) 'प्रश्न काढणे', या तुमच्या कामात विद्यार्थ्यांची मदत घेणे
(2) प्रश्न काढणे किती जिकिरीचे काम आहे याची विद्यार्थ्यांना जाणीव करुन देणे.
(3) तुमच्या विद्यार्थ्यांची विश्लेषण करण्याची क्षमता आणि कल्पकता विकसित करणे.
(4) तुमच्या विद्यार्थ्यांना एक चांगला पेपर सेटर म्हणून घडवणे.

**109.** भाषा मूल्यमापनाचे उद्दिष्ट म्हणजे

(1) त्यांचे समग्र किंवा समाकलित (summative) मूल्यमापन करणे.
(2) विद्यार्थ्यांची भाषिक कामगिरी, पाहणे
(3) विद्यार्थ्यांचे भाषा प्रभुत्त्व, पाहणे
(4) प्रत्येक विद्यार्थ्याने त्याच्या सहपाठी विद्यार्थ्यांच्या तुलनेत काय साध्य केले आहे, हे पाहणे

**110.** शैक्षणिक साधनांच्या उपयोगाचे उद्दिष्ट म्हणजे

(1) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीत सुधारणा करणे
(2) अनुशासनहीनतेच्या घटनांवर आळा घालणे
(3) वर्गात विद्यार्थ्यांचे लक्ष लागावे
(4) शिक्षण उपक्रमात विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवणे

**111.** तुमची एक विद्यार्थिनी तिचे आवडते पुस्तक घेते आणि चित्राच्या मदतीने इतरांना सांगते. हे म्हणजे

(1) स्वनिमिक जागरुकता
(2) वाक्यरचना जागरुकता
(3) कथन जागरुकता
(4) उदयिमान वाचन अवस्था

**सूचना :** पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **112** ते **120** यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.

घर म्हणजे माणसांचं, कुटुंबाचं प्रतिबिंब! माणसाच्या जगण्याला आकृतिबंध देणारी एक रचनाच! सतत बदलत राहणाऱ्या माणूसवृतीचं एक प्रतीकच! माणसाच्या स्वभावानुसार घराचा चेहरा दिसतो. घर माणसांशी इतकं एकरुप होत असतं की घराला माणसाचा चेहरा बरोबर ठाऊक असतो. माणूस घराच्या उंबऱ्याबाहेर पडला की त्याला एक अदृश्य बुरखा धारण करावा लागतो. घरात प्रवेश करताना मात्र माणसाचा बुरखा आपोआप गळून पडतो. माणूस घरात बुरखा घालून राहू शकत नाही. मला नेहमी असं वाटतं की घर नुसतं निवारा, संरक्षण, विश्राम अन् स्थैर्य देत नाही तर खऱ्या चेहऱ्याने काही काळ जगता येणं ही माणसाची गरज देखील घर पूर्ण करतं. माणसाला जगण्याची ओळख आणि त्या जगण्याला एक चौकट मिळते ती घरामुळेच.

घर! माणसाच्या जिवाभावाचा मित्र! माणसाच्या संस्कृतीचं एक प्रतीक! माणसाच्या प्राचीन काळापासूनच्या जीवनशैलीचा महत्त्वाचा साक्षीदार! त्याच्या गरजांप्रमाणे, सवयींप्रमाणे आणि लहरीप्रमाणे निरंतर बदलत आलेला! निसर्गातला प्रत्येक प्राणी कळपात राहतो. जिथे त्याचा कळप जातो तिथे त्याचं घर असतं. प्राण्यांना आडोसा लागत नाही, भिंत लागत नाही पण मनुष्यप्राण्याला मात्र त्याच्या भटक्या काळातही निवारा हवा असे, आसरा हवा असे. समुहात तो त्याला मिळतही असे. समूहात त्याला सुरक्षितही वाटत असे पण

www.careerindia.com

शेतीचा शोध लागला, जमिनीचं महत्त्व समजलं, कुटुंबभावना निर्माण झाली आणि मग ते जीवनचक्र पूर्ण करण्यासाठी 'घर' ह्या बंदिस्त, सुरक्षित आणि 'खाजगी' वास्तूची निर्मिती झाली आणि मग न हलणाऱ्या, न बदलणाऱ्या, दणकट, कायमस्वरूपी घराचा जन्म झाला. पशू-पक्षी हे अन्नपाण्याच्या शोधात फिरतात आणि तिथेच वास्तव्य करतात पण माणूस मात्र त्याला हवं तिथे आधी घर बांधतो, त्याला हवं ते अन्न आणि पाणी तो घरात आणून ठेवतो. तो घराजवळ पाणी निर्माण करतो. अन्नधान्य, भाजीपाला, फळं हे सारं काही तो त्याला हवं त्या पद्धतीने मिळवतो, जमवतो आणि साठवून ठेवतो ते घरामुळे! घर म्हणजे माणसाला सांभाळणारा, सावरणारा आणि गोंजारणारा मित्र! त्याला निवारा अन् संरक्षण देणारा वास्तुपुरुष अन् असंख्य भावनांचा अनुभव देणारा भावसखा.

**112.** माणसाच्या जगण्याला कशामुळे अर्थ प्राप्त होतो?

(1) कुटुंब (2) स्वभाव

(3) वृत्ती (4) घर

**113.** माणसाचा बुरखा गळून पडतो म्हणजे

(1) तो घराला महत्त्व देतो (2) तो घराचे मोठेपण स्वीकारतो

(3) तो घराला जगण्याची चौकट मानतो (4) त्याचा खरा चेहरा समोर येतो

**114.** 'पशु-पक्षी हे अन्नपाण्याच्या शोधात फिरतात *आणि* तिथेच वास्तव्य करतात.' अधोरेखित शब्द काय आहे?

(1) कर्ता (2) शब्दयोगी अव्यय

(3) उभयान्वयी अव्यय (4) कर्म

**115.** घर म्हणजे _____ पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(1) मानवी संस्कृतीचे प्रतीक (2) माणसाच्या गरजांचे विरोधक

(3) मानवी जीवनशैलीचा साक्षीदार (4) माणसाचा खरा मित्र

**116.** 'निसर्गातला प्रत्येक प्राणी कळपात राहतो' यातील समूहवाचक नाम कोणते?

(1) प्राणी (2) कळप

(3) राहतो (4) निसर्ग

**117.** घर पुढीलपैकी काय देत नाही?

(1) निवारा (2) संरक्षण

(3) स्थैर्य (4) संपत्ती

**118.** घराला कशामुळे चेहरा प्राप्त होतो?

(1) माणसाच्या स्वभावामुळे (2) घराच्या उंबरठ्यामुळे

(3) माणसाच्या प्रवेशामुळे (4) माणसाच्या चेहऱ्यामुळे

**119.** 'तो घरात आणून ठेवतो' अधोरेखित काय आहे?

(1) सकर्मक क्रियापद (2) अकर्मक क्रियापद

(3) उभयान्वयी अव्यय (4) संयुक्त क्रियापद

**120.** उताऱ्याप्रमाणे पुढीलपैकी कोणती बाब घराला लागू होत नाही?

(1) सुरक्षित (2) सामुहिक

(3) खाजगी (4) बंदिस्त



www.careerindia.com

परीक्षार्थींनी **भाषा–II** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील **(प्रश्न क्रमांक 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part–V (Q. Nos. 121–150)**, if they have opted **MARATHI** as **Language–II** only.

www.careerindia.com

CAREERINDIA

## PART—V / भाग—V

### LANGUAGE—II / भाषा—II
### Marathi / मराठी

| |
|---|
| ***महत्त्वपूर्ण*** : परीक्षार्थींनी **भाषा–II** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील **(प्रश्न क्रमांक 121–150)** यांची उत्तरे द्यावीत. |

**सूचना :** पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **121** ते **127** यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.

आषाढातला तो पहिलाच दिवस होता. श्रावणसरींच्या स्पर्शाने हिरवी मखमली दुलई ल्यालेली धारा सूर्याच्या मावळत्या किरणांनी फार लोभस दिसत होती. मंद वारा वाहत होता. सर्वत्र भरून राहिलेली ओलसर प्रसन्नता नुकताच निरोप दिलेल्या श्रावणाच्या अस्तित्वाची आठवण करून देत होती. त्याच परिसरात हिरव्यागार माळरानावर तितक्याच हिरवाईने ओथंबलेली एक लहानशी टेकडी दिसली. टेकडीवरती एका बाजूने उंचावलेली एक दरड मावळतीचे सूर्यकिरण झेलत अशी झोकात उभी होती की, तिला ओलांडून मला पुढे जाववेना. खाली उतरण्याचा मोह मला पुढे सरकू देईना. तसाच खाली उतरलो. त्या दणकट दरडीला माझ्या दीर्घ अन् सामर्थ्यवान् बाहूंनी धरून ठेवत तिला टक्कर देण्यातला आनंद लुटू लागलो. त्या दरडीवर पाय ठेवून सर्वत्र एकदा नजर फिरवली. सूर्यास्ताच्या किरणांचा सोनेरी लेप मिरवणारी ती टेकडी मला एखाद्या सम्राटाच्या राजसिंहासनासारखी भासली. भ्रमंतीचा सारा शीण क्षणात दूर झाला अन् आता इथेच जरा विसावा घ्यावा, असा विचार करत असतानाच त्या टेकडीवर उभा असलेला, माझ्याकडे एकटक नजरेने बघत असलेला एक मानव माझ्या दृष्टीस पडला. दुःखाने विदीर्ण झालेल्या त्या मानवाला ना त्याच्या देहाची शुद्ध होती, ना त्याच्या वस्त्रांची! दुःखाने सैरभैर झालेल्या त्या माणसाच्या मनातलं काहूर त्याच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झालं होतं. माझ्या नुसत्या दर्शनानेच त्याच्या हळव्या अंतःकरणाचा बांध फुटला होता. त्याच्या व्याकूळ नेत्रांमधल्या अश्रुपटलांनी मला तिथेच खिळवून ठेवलं. मानवी भावभावनांच्या गुंत्यात कधीही न अडकणाऱ्या मला त्या घनव्याकूळ डोळ्यांनी तिथेच अडवून ठेवलं अन् त्याच क्षणी पृथ्वीवरील मानवाच्या भावनांशी असलेल्या माझ्या नात्याचा प्रवास सुरू झाला. कुबेराने तडीपार केलेला तोच तो अलकानगरीतला यक्ष होता. विरहवेदनेने विद्ध झालेला-करुणार्त! रामगिरीवर बरसणाऱ्या श्रावणसरींनी आधी त्याला भिजवलं असेल, त्या रेशमी जलधारांनी त्याच्या मनःपटलावर असंख्य इंद्रधनुष्यही उमटवली असतील; प्रिय पत्नीच्या आठवणींचं हिरवंगार मोरपीस त्याच्या मनात थरारलं असावं! अशा वेळी अचानक सामोऱ्या आलेल्या मला पाहून यक्षाला काय वाटलं असेल बरं?

**121.** "विरहवेदनेने विद्ध झालेला करुणार्त." असे लेखकाने कोणाचे वर्णन केले आहे?

(1) श्रावणसरींचे
(2) यक्षाचे
(3) इंद्रधनुष्याचे
(4) मावळतीच्या सूर्यकिरणांचे

**122.** लेखकाने सम्राटाच्या राजसिंहासनाची उपमा कोणाला दिली आहे?

(1) इंद्रधनुष्याला
(2) हिरव्या माळरानाला
(3) रामगिरीला
(4) टेकडीला

**123.** "श्रावणाच्या अस्तित्वाची आठवण करुन देत होती." यातील अधोरेखित काय आहे?

(1) अकर्मक क्रियापद
(2) संयुक्त क्रियापद
(3) विशेषण
(4) सकर्मक क्रियापद

www.careerindia.com

**124.** ''अशी झोकात उभी होती <u>की</u> तिला ओलांडून मला पुढे जाववेना.'' यातील अधोरेखित शब्द ओळखा

(1) उभयान्वयी अव्यय
(2) न्यूनत्वबोधक अव्यय
(3) विकल्पबोधक अव्यय
(4) शब्दयोगी अव्यय

**125.** मावळतीचे सूर्यकिरण कोण झेलत होते?

(1) टेकडी
(2) हिरवळ
(3) माळरान
(4) दरड

**126.** लेखकाला श्रावणाचे अस्तित्व कशामुळे जाणवत होते?

(1) ओलसर प्रसन्नतेमुळे
(2) मखमली दुलईमुळे
(3) हिरव्या माळरानामुळे
(4) मावळत्या सूर्यकिरणांमुळे

**127.** पुढीलपैकी कोणता शब्द उताऱ्यातील 'काहूर' या शब्दाचा अर्थद्योतक नाही?

(1) आनंद
(2) चिंता
(3) गोंधळ
(4) दुःख

**128.** लेखनाच्या विविध अवस्था/टप्पे समजून लेखन शिकणे म्हणजे

(1) लेखनाचे उत्पादक धोरण
(2) विश्लेषणात्मक लेखन
(3) सर्जनशील लेखन
(4) लेखनाच्या प्रक्रियेचे धोरण

**129.** विद्यार्थ्यांच्या संभाषण कौशल्याचे मूल्यमापन करण्यासाठी पुढीलपैकी कोणती मूल्यमापन पद्धती अधिक उपयुक्त ठरेल?

(1) नाटकात भूमिकाभिनय करणे
(2) ध्वनिफीत ऐकून त्यावर भाष्य करणे
(3) सांगितलेल्या मुद्यावर भाषण लिहिणे
(4) चित्र पुस्तकातील दृष्याचे विवरण सांगणे

**130.** चॉम्स्कीच्या मते माणसांकडे भाषा विकसित करण्यासाठी ______ हे असते.

(1) जैविक कल
(2) विशिष्ट दृष्टिकोणात्मक संच
(3) संप्रेषण तत्परता
(4) शैक्षणिक संच

**131.** अगदी आरंभीच्या अवस्थेपासून शाळेत बहुभाषिकतेचे धोरण स्वीकारल्याने पुढीलपैकी कोणत्या गोष्टीवर आळा घालता येईल?

(1) शैक्षणिक अक्षमता
(2) एखाद्याची त्याची भाषा लुप्त होणे
(3) सुमार संभाषण कौशल्य
(4) शाळेतील विद्यार्थ्यांची गळती

**132.** नवीन पाठाची सुरुवात करण्यापूर्वी तुम्ही विद्यार्थ्यांना तरतरीत होण्यासाठी गमती जमतीच्या गोष्टी करायला लावता. हे करण्याचे कारण

(1) शिक्षक म्हणून स्वतःचा भार हलका करणे

(2) पाठसुरु करण्यापूर्वी वर्गात अनुशासन असणे

(3) विद्यार्थ्यांचे लक्ष वळवणे

(4) विद्यार्थ्यांना वर्गासाठी प्रेरित करणे

**133.** अध्ययनाचा सिद्धांत म्हणून विधायकतावाद (Constructivism) मानते

(1) सर्व विद्यार्थी भाषा शिकू शकत नाही

(2) शिकणे ही पूर्णतः मानसिक घटना आहे

(3) शिकणे ही सामाजिक गुंफण आहे

(4) शिकणे हे वैयक्तीक गुणविशेष आहे

**134.** अनेकदा माणसे एकाच वाक्यात अनेक भाषाचे घटक गुंफतात. असे करणे म्हणजे

(1) भाषा मिश्रण

(2) समाज भाषा विज्ञान

(3) बोली

(4) भाषा बदल

**135.** विद्यार्थांना अनेकदा भाषेच्या वैशिष्ट्यपूर्ण उच्चारण नियमांमुळे बोलण्यात अडचण येते. या अडचणीवर मात करण्यासाठी कोणता उपाय उपयुक्त आहे?

(1) समुपदेशकाच्या मदतीने उच्चार उपचार करुन घेणे

(2) खेळ सदृष्य उपक्रम करणे ज्यातून वर्गात मौखिक संभाषण करावे लागेल

(3) विद्यार्थांच्या चुका त्या त्या वेळेलाच दुरुस्त करणे

(4) विद्यार्थ्यांना वर्गात वाचन करण्यास उत्तेजन देणे

**136.** कादंबरी वाचणे, हे कशाचे उदाहरण आहे?

(1) गहन वाचन

(2) न्याहाळणे

(3) चाळणे

(4) विस्तृत वाचन

**137.** निबंधात 'अवतरण' वापरणे याचे प्राथमिक उद्दिष्ट कोणते?

(1) गुंतागुंतीचा मुद्दा स्पष्ट करणे

(2) लेखकाचा दृष्टिकोण मांडणे

(3) एखाद्या माहितीचे विश्लेषण करणे

(4) निबंधाची शैली ठरवणे

**138.** इयत्ता आठवीची शिक्षिका विद्यार्थ्यांना एक लेख देते. या लेखाचा दर्जा त्यांच्या पातळीपेक्षा किंचित वरचा आहे. विद्यार्थ्यांनी त्या संबंधाने अनेक उपक्रम करायचे आहेत. या उपक्रमाला काय म्हणता येईल?

(1) अनाकलनीय आदान (Incomprehensible inputs)

(2) वाचन आकलन (Reading comprehension)

(3) आकलनीय आदान (Comprehensible inputs)

(4) कल्पनाबंध/सिद्धांत शिकणे (Learning hypothesis)

www.careerindia.com

**139.** व्याकरणाचे शिक्षण प्रामुख्याने कोणत्या बाबतीत उपयुक्त ठरते?

(1) अचूकता
(2) साक्षरता
(3) अंकसाक्षरता
(4) ओघवता

**140.** व्याकरण शिक्षणाचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना संभाषण करण्यास प्रवृत्त करणे. पुढीलपैकी कोणती कृती या उद्दिष्टाशी सुसंगत नाही?

(1) विद्यार्थ्यांना अशा प्रकट सूचनांची आवश्यकता असते ज्यातून व्याकरणिक घटकांची व्यापक संभाषण संदर्भाशी सुसंगती लागते.

(2) विद्यार्थ्यांनी तितक्याच गोष्टी शिकल्या पाहिजेत ज्या तात्पुरत्या संभाषणास आवश्यक असतात.

(3) चुका दुरुस्त करणे ही शिक्षकाची प्राथमिक जबाबदारी नाही.

(4) विद्यार्थ्यांचे व्याकरणाच्या प्रत्येक घटकावर प्रभुत्व असणे.

**141.** वाचनात 'शब्दार्थ मीमांसा संकेत' मदतरूप ठरतात.

(1) शब्दाच्या अचूक उच्चारणात
(2) अर्थलावण्याच्या प्रक्रियेला मद्तरुप ठरते
(3) व्याकरणिक प्रारुप समजून घेण्यासाठी
(4) शब्दाची उकल करण्यात

**142.** भाषा अध्ययन-अध्यापनाची कोणती पद्धती असे मानते की 'भाषा ही एक सवय' आहे?

(1) सहकारी भाषा शिक्षण
(2) नैसर्गिक पद्धती
(3) श्राव्यभाषिकता
(4) संभाषणात्मक भाषा शिक्षण

**सूचना :** पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **143** ते **150** यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.

पडणाऱ्या पावसाच्या आवाजाच्या आकर्षणाबरोबर मला आणखी एका आवाजाचं आकर्षण वाटे. तो आवाज म्हणजे घुबडाचा आवाज. आमच्या घराजवळ, ओढ्याच्या पलीकडे वडाचं खूप मोठ्ठं झाड आहे. त्या झाडावर बसून मध्य रात्री घुबड घुमत असे. त्याचा घुत्कार ऐकला की काळजात धडकी भरे. एकीकडे पावसाची संततधार लागलेली असे. त्याचा रप रप आवाज काळोखाची भयाणता वाढवी त्या भयाणतेत घुबडाचा आवाज भर घाली. घुबड घुमायला लागलं की मी टक्क जागी होई. आईला किंवा मोठ्या बहिणीला बिलगे. कानात प्राण आणून तो आवाज ऐके. खूप वेळ तो आवाज सहन होत नसे. काळजाचे ठोके वाढायला लागले, श्वास अडकायला लागले, भीतीने किंकाळी फोडावी वाटली की मी उठून धू ऽऽ म पळत सूटे. ओसरीवर बाबांची कॉट असे. माझ्या धावत येण्याची चाहूल त्यांना बरोबर लागे. 'घाबरला का आमचा वाघ?' बाबा विचारीत. मी त्यांच्या घोंगडीत शिरून त्यांना बिलगे. 'थांब, थांब, हाकलू आपण घुबडीला' असं म्हणत ते उठत काठी आपटून, आवाज करून तिला हाकलून देत. पुढे मोठी झाल्यावर, कॉलेजला जायला लागल्यावरसुध्दा मी घुबडीच्या आवाजाने जागी झाले की माझे बाबा तिला हाकलायला उठत, मी म्हणे, 'नका हाकलू बाबा तिला, भीती नाही वाटत.' खोल खोल विवरातून घुमत आल्यासारखा तिचा घुमारा काळजाला पिळ पाडू लागला की मी कुठल्यातरी अज्ञात विश्वात निघून जात असे.

www.careerindia.com

CAREERINDIA

घुबडीच्या आवाजाइतकाच भुरळ घालणारा आणि भीती वाटायला लावणारा दुसरा आवाज म्हणजे डोबीचा धबधबा. पुराचं पाणी खडकांवर, कपारींना आपटत आपटत फेसाळत पुढे जाऊन पन्नास-साठ फूट खोल दरीसारख्या भागात कोसळे. त्या कोसळण्याचा धाब ऽऽ धा ऽऽ ब आवाज रात्रीच्या निरव शांततेत भेसूर वाटे. जीवाचा कान करून काळजावर आपटणारा तो आवाज मी झोप लागेपर्यंत ऐकत असे.

**143.** लेखिकेला पावसाबरोबरच आणखी कोणत्या गोष्टीचे आकर्षण वाटते?

(1) घुबडाचा आवाज (2) वडाचं झाड

(3) काळोख (4) शेजारचा ओढा

**144.** घुबड घुमायला लागल्यावर लेखिकेची जी परिस्थिती होत असे त्यातील चुकीची गोष्ट कोणती?

(1) कानात प्राण आणून आवाज ऐकणे (2) काळजाचे ठोके वाढणे

(3) आनंदाने नाचायला लागणे (4) आई-बहिणीला बिलगणे

**145.** रात्रीची निरव शांतता कशामुळे भंग पावायची?

(1) वडिलांच्या काठी आपटण्यामुळे (2) भीतीने किंकाळी फोडल्यामुळे

(3) काळजाचे ठोके वाढल्यामुळे (4) डोबीच्या धबधब्यामुळे

**146.** पुढील एकवचनी-अनेकवचनी शब्दजोडीपैकी चुकीचा पर्याय कोणता?

(1) किंकाळी—किंकाळ्या (2) दरी—द-या

(3) खडक—खडके (4) ठोका—ठोके

**147.** ''अज्ञात विश्वात निघून <u>जात असे</u>'' अधोरेखित काय आहे?

(1) सकर्मक क्रियापद (2) संयुक्त क्रियापद

(3) शब्दयोगी अव्यय (4) अकर्मक क्रियापद

**148.** 'विवर' या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द ओळखा

(1) बीळ (2) पोकळी

(3) ओढा (4) गुहा

**149.** ''ओढ्याच्या पलीकडे वडाचं खूप मोठ्ठं झाड आहे.'' या वाक्यातील अव्यय ओळखा.

(1) पलीकडे (2) वड

(3) झाड (4) ओढा

**150.** मध्यरात्री घुबड कशावर बसून घुमत असे?

(1) ओढ्यावर (2) ओसरीवर

(3) धबधब्यावर (4) वडाच्या झाडावर



www.careerindia.com

SPACE FOR ROUGH WORK

www.careerindia.com

★ ★ ★

***खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :***

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्नपत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.
2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या **चार** पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तर-पत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ काळे किंवा निळे बॉलपॉइन्ट पेन ने संपूर्ण भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.
3. परीक्षार्थींनी उत्तर-पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर-पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तर-पत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी- पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तर-पत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
5. चाचणी-पुस्तिका/उत्तर-पत्रिका यांवर दिलेले कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
6. OMR उत्तर-पत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेशपत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.
7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.
8. मोबाइल फोन, तार-रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.
9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याचे/तिचे प्रवेशपत्र पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.
11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तर-पत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर-पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.
13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.
14. चाचणी-पुस्तिका आणि उत्तर-पत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तर-पत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे.** ***चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.***

www.careerindia.com

CAREERINDIA

## निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर-पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **नीले/काले बॉलपॉइंट पेन** से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर-पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर-पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर-पत्र के कोड या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
5. परीक्षा पुस्तिका/उत्तर-पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका कोड व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से उपस्थिति-पत्र में लिखें।
6. OMR उत्तर-पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी। इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्विच्ड ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए। इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और परीक्षार्थी के विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर-पत्र दिए बिना एवं उपस्थिति-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार उपस्थिति-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर-पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा। **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अँगूठे का निशान उपस्थिति-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ।**
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी परीक्षण संस्था के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला परीक्षण संस्था के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
14. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर-पत्र का कोई भाग अलग न करें।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल/कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर-पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।***

## READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Blue/Black Ballpoint Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the Examination Hall/Room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the Examination Hall/Room. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against the candidate including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Examining Body with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Examining Body.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, before leaving the Hall/Room, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall/Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

www.careerindia.com